**नि.फौ.के. नं. ११६/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. विजय**
**निशाण क्र. १९**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपी हा इतर गुन्हयांत कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह येथे असल्याने त्यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सदर आरोपीस हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – रमेश भिकाजी किंजळे,

**वय** – ६२ वर्षे, **व्यवसाय** – पुजारी,

**मुळ राहणार** – कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सध्या राहणार** – ताम्हाणे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** मी स्वामी समर्थ यांच्या ताम्हाणे येथील मठात पुजारी म्हणुन काम पाहतो. दिनांक २३/१२/२०२५ रोजी मी स्वामी समर्थ यांच्या ताम्हाणे येथील मठात हजर होतो. त्यादिवशी पोलीस एका आरोपीला घेवुन मठामध्ये आले होते. त्यावेळी पोलीसांनी मला ''हा आरोपी तुमच्याकडे या आधी आला होता का'', असे विचारले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, *''दिनांक २९/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०७:३० वाजताच्या दरम्यान सदरचा इसम मठात आला होता. त्यावेळी मी त्याला कोण, कुठला असे*

*विचारल्यावर त्याने मला त्याचे नाव – विजय गुरव, राहणार – मलकापुर, सध्या राहणार – राजापुर व एम.एस.ई.बी. मध्ये वायरमॅन म्हणुन कामाला असल्याचे त्याने सांगितले. पुढे त्याने मला माझ्या गाडीचे लाईट नसुन आज रात्री येथेच झोपतो असे म्हणाला, त्यावर मी त्याला इथे वाघ येतात, तु येथे राहु नको, तु देवरुख येथे जावुन लॉज घेवुन रहा, अ*से सांगितले. त्यानंतर त्याने मला खायला माझ्याकडे मागितले असता, माझ्याकडची अर्धी भाकरी व भाजी मी त्याला खायला दिली. त्यानंतर, मी माझ्याकडची भाकरी खावुन माझ्या रुममध्ये झोपण्यास गेलो''.

**०२**. त्यावेळी मी त्याला मठात झोपु नकोस, असे सांगितले असता, रात्री ०८:१५ – ०८:३० च्या सुमारास मी माझ्या रुमध्ये झोपण्यासाठी गेलो. दुसऱ्या दिवशी पहाटे ०३:३० वाजता मी उठलो व त्यावेळी पाहिले असता, तो इसम मठामध्ये नव्हता. तो रात्री मठातुन कधी निघुन गेला, हे मला माहिती नाही. त्यानंतर पोलीसांकडुन मला सदर इसम हा अट्टल चोर असुन त्याने अनेक चोऱ्या केल्याचे कळाले.

**०३**. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्ही.सी.द्वारे दिसत असलेला आरोपी तोच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडुन</u> –**

**०४**. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात मी जी माहिती सांगितलेली ती माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वामी समर्थ यांच्या ताम्हाणे येथील मठात पुजारी म्हणुन काम पाहत असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे

नाही की, सरतपासातील मजकुर मी संजयकुमार महाडीक यांच्या सांगण्यावरुन कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, स्वामी समर्थ, ताम्हाणे असा मठ अस्तित्वातच नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्वामी समर्थ, ताम्हाणे या मठामध्ये मी पुजारी म्हणुन काम पाहत नाही.

०५. ***प्रश्नः*** *तुमच्या म्हणण्याप्रमाणे, विजय गुरव नावाचा इसम वायरमॅन म्हणुन कामास नव्हता, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *तशी बाब त्या इसमानेच मला सांगितली होती.*

०६. ***प्रश्नः*** *तुमच्या म्हणण्याप्रमाणे, आरोपी हा अट्टल चोर असुन त्याने अनेक चोऱ्या केल्या आहेत, अशी बाब तुमच्या जबाबात सांगुन तसा जबाब नोंदविण्यास तुम्हाला कोणतीही अडचण नव्हती, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *पोलीसांनी माझ्याकडे तसे मागितले नव्हते.*

०७. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सहआरोपी म्हणुन समाविष्ठ करु नये, याकरीता आज रोजी मी पोलीसांच्या बाजुने साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा कधीही स्वामी समर्थ, ताम्हाणे येथील मठात आलेला नव्हता व त्याने माझ्याकडे अन्न वस्त्र मागितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन, त्यांना मदत करण्यासाठी आरोपी हा तोच इसम असल्याचे मी कथन करीत आहे.

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावच्या जबाब अभिलेखात कसा आला, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद करुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.20 15:04:07 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २०/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 20/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 20/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 20/04/2026 |